परवानगी वर्ष :- २०१०-२०११
माध्यम : - इंग्रजी
कायम विना अनुदान

जा.क.शिउसं/ माध्य-३/१२/प्र.मा./पुवि/२०११ 90800/2 (५)
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : - 3 1 MAY 2011

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद,पुणे

विषय :- कायम विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाच्या इ.७वी पर्यंत सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस जोडून इ.८वी ते १० वी चे इंग्रजी माध्यमाच्या वर्गांना प्रथम मान्यता प्रदान करणेबाबत.. **श्री.जे.आर.गुंजाळ इंग्लिश मिडियम स्कूल,आळेफाटा,पुणे**

संदर्भ- **१) शासन निर्णय क्र.नमाशा-२०१०/(९६/२०१०)/माशि-१ दि.१०.०३.२०१०**
२) आपले पत्र क्रमांक जिप/शिक्षण/माध्य/१४२७/११ दि. ०२.०५.२०११
**३) शासन पत्र क्रमांक इंमाशा-२०१०/(०९/१०)/माशि-१ दिनांक ३०.०३.२०१०**
**४) शासन निर्णय क्रमांक नमाशा-२०१०/(९६/१०)/माशि-१ दिनांक १४.१०.२०१०**

उपरोक्त विषयासंदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशी विचारात घेऊन **ओम चैतन्य फौंडेशन,आळेफाटा,जुन्नर,पुणे** संचलित **श्री.जे.आर.गुंजाळ इंग्लिश मिडियम स्कूल,आळेफाटा,पुणे** या माध्यमिक शाळेस खालील अटींवर आणि तपासणी अहवालातील सर्वच सूचनांची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्याच्या शर्तीवर कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता प्रदान करण्यात येत आहे. **(जून-२०१० पासून तात्पुरती प्रथम मान्यता देण्यात येत आहे.)**

१. नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
२. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.
३. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.
४. संचनिश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.
५. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.
६. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.
७. शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
८. सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

**इतर अटी :-**

**जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.**

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.
२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येंवू नयेत.
३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी.व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.
५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे.वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ :-१) शासन पत्र क्रमांक याचिका-२००९/प्र.क्र.२४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर २००९.
२) संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२००९/६४११६/याचिका/१५ क(८)९३४४ दिनांक २४ सप्टेंबर-२००९.

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तींची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु **प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी.**

स्थळ प्रतीवर मा.शि.उ.सं.यांची स्वाक्षरी असे.

(बाळासाहेब ओव्हाळ )
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-**१करिता**

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे.

**२/- त्यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा.**

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,

१. मुख्याध्यापक,
**श्री.जे.आर.गुंजाळ इंग्लिश मिडियम स्कूल,आळेफाटा,ता.जुन्नर जिल्हा पुणे.**

प्रत माहितीसाठी सादर,

१. डॉ.सुवर्णा सि.खरात
अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.

२. निवडनस्ती.